# Priyadarshini Mahila Mahavidyalaya, Wardha

## 7.1.1 Safety measures, Counselling and gender Sensitisation Activities

### CCTV: CCTV cameras at all strategic locations on the campus

The college has installed CCTV cameras for enhancing the security of the students also for surveillance in examination time. These cameras helps in order to monitor teachers and students teaching-learning interaction. Eight CCTV Cameras has been installed in the college.




*Figure 1 Survillance Computer*





*Figure 2 Camera View Room wise*




*Figure 3 Camera View – ZOOM*




*Figure 4 Exam Control Room Camera 1*




*Figure 5 Corridor - Camera 2*




***Figure 6   Room No. 1 - Camera 3***




***Figure 7  Room No. 2 - Camera 4***



***Figure 8  Room No. 3 - Camera 5***





*Figure 9  Room No. 4 - Camera 6*




*Figure 10  Room No. 5  - Camera 7*

## *Counselling Centre*

Counseling Centre for the Student with the help of ROOTS Foundation for Behavioural Sciences Nagpur. It's an important platform for students to discusses and come up with some solution of problems

**Inauguration of Counseling Center and signing of MoU with Roots Foundation for Behavioural Sciences, Nagpur (03April 2017)**






**Promotion of gender equity programmes:** College organised special lectures and workshop/seminars to sensitized students and staff

**Special Lectures:**

**2015-16**

1. To facilitated staff and students regarding gender issues in social research, talk of Dr. Sanjay Kambale, Assistant professor, Krantijyoti Savitribai Phule Women Study Centre, Pune University was organized.




2. Prof Vimal Thorat, Indira Gandhi National Open University, New Delhi delivered a lecture on the topic, “Contemporary problems of Women”.



**2016-17**

3. Social Activist Prof Javed Pasha delivered a lecture on the topic, "Muslim Women: past, Present and future (Muslim Stree: Kal , Aaj aur Kal)".

**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha** is with **Pratibha Taksande** and **7 others**.

Jan 3, 2017 • View Thread

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्राच्या वतीने क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन आज महाविद्यालयात महिला मुक्ति दिन म्हणुन साजरा करण्यात आला. यानिमित्त मुस्लिम महिलांच्या स्थिती व गतीची मांडणी करण्याकरीता मुस्लिम मराठी साहीत्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व मुस्लिम सुधारणावादी कार्यकर्ते प्रा जावेद पाशा, नागपुर यांना निमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन जमात-ए-इस्लामी हिंद चे सैय्यद नियाज अली व जी एस कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ अब्दुल बारी उपस्थित होते.



**2017-18**

4. Prof Pramod Narayane delivered a lecture on women issues.

- 


5. Lecture of Adv. Ajit Sadavarte on the topic, “Legislations regarding women and Marriage”.



**2018-19**

6.Gender Sensitization Initiatives: An interaction with Miss India Transgender Queen Veena Sendre (12 February 2019) It was a discussion about the issues of  Transgender.









*The Social Sciences Study Circle arranged a special talk of Transgender Veena Shendre (Miss Trans Queen India 2018 Winner) for students. The purpose of this talk was to clear their misconcepts about the LGBT community. Our college alumanae Miss Nita Ughade helped to arrange this programe.*

7. World Women's Day Celebration, Ojas S. V. Research Fellow, IISER Pune was the speaker (8 March 2019).






**2019-20**

8. Dialogue with Sakshana Salgar (Women's Political Participation) 20/07/2019



**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha**

Jul 26, 2019 • View Thread

**लोकमत**



मार्गदर्शन करताना सक्षणा सलगर, मंचावर आशा मिरगे, वांदिले, डॉ. देशमुख.

# युवतींनो, तंत्रज्ञानासोबत तत्त्वज्ञान आत्मसात करा

## सक्षणा सलगर : प्रियदर्शिनीत साधला संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** हल्लीची युवा पिढी ही सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकून पडली असून आपण किती मॉडर्न आहोत, हे दाखविण्याच्या नादात केवळ सवंग व वायफळ चित्रफिती व छायाचित्रे पोस्ट करण्यात व त्यावर लाईक, कमेंट्स देण्यात आपला अमूल्य वेळ दवडत

काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आशा मिरगे (अकोला), राकाँच्या महिला जिल्हाध्यक्ष शरयू वांदिले, माधवी साबळे, प्राचार्य डॉ. रंभा सोनाये, डॉ. अनिता देशमुख उपस्थित होत्या.

आपण कसे दिसतो यापेक्षा आपल्या मनातील भाव काय आहे यावरच आपले यशापयश अवलंबून असल्याचे सांगत सलगर म्हणाल्या ,

9. Women Security Awareness Campaign (14 January 2020). Assiatant Police Inspector Meghali Gawande Addressed about security tips

**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha** is with **Shraddha Wadekar** and **4 others**.

Jan 14, 2020 • View Thread

महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने आज महिला सुरक्षांविषयक जागृती करण्यासाठी वर्धा पोलीस दामिनी पथकाच्या API मेघाली गावंडे यांना निमंत्रित करण्यात आले होते.




# महिलांनो, स्वतः दक्ष व सजग राहा

## पोलिस उपनिरीक्षक मेघाली गावंडे : प्रियदर्शिनी महाविद्यालयात उद्बोधन

**सकाळ वृत्तसेवा**

वर्धा,ता. १४ : अलीकडे महिलांसंबधी वाढत्या गंभीर प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर शासन व पोलिस विभाग महिलांना सुरक्षा देण्यासाठी अहोरात्र प्रयत्नरत आहे. असे असले तरी अशी प्रकरणे उद्भवणारच नाहीत यासाठी स्वतः महिलांनी सुद्धा दक्ष व सजग राहणे अत्यंत गरजेचे आहे, असे मार्गदर्शन वर्धा पोलिसांच्या दामिनी पथकाच्या प्रमुख पोलिस उपनिरीक्षक मेघाली गावंडे यांनी व्यक्त केले.

येथील प्रियदर्शनी महिला निवारण समितीच्या वतीने महिला सुरक्षेसंबधी आयोजित विशेष जनजागृती कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. रंभा सोनाये, महिला समिती प्रमुख डॉ. अनिता देशमुख, डॉ. प्रतिभा ताकसांडे, डॉ. सोनाली सिरभाते आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना गावंडे म्हणाल्या, महिलांनी स्वतःच सजग व दक्ष कसे राहावे हे स्पष्ट करताना आपण कुणासोबत, कुठे, कोणत्या वेळी, कशाकरिता जात आहेत, याचा प्रत्येक मुलींने थोडा वेळ थांबून जर शांतपणे विचार केला तर पुढे येणारी कोणताही अनुचित प्रकार घडत असेल तर मुलींनी सर्वात प्रथम तो आपल्या कुटुंबीयांच्या कानी टाकायला हवा. पोलिसांकडे येणाऱ्या महिलांसंबधिच्या विविध ब्लॅकमेलींग व फसवणुकीच्या प्रकरणांची उदाहरणे देऊन त्यांनी मुलींना सोशल मिडिया व मोबाईलच्या व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनिता देशमुख यांनी केले. संचालन डॉ. सोनाली शिरभाते यांनी केले. निकिता शेंद्रे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व शिक्षक, शिक्षकेतर



वर्धा : कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना दामिनं

**Seminar/workshop**

1. Seminar on 'Legal Rights of Women' with the help of District Legal Aid Centre, Wardha on March 8, 2017.  Justice Ramteke addressed on women issues.



2. Screening of Film MANTHAN on account of World Women's Day March 8, 2017 in collaboration with IPTA Wardha and Yeshwantrao Date Memorial



3. Workshop on ‘The Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013’. Dr. Indrajit Khandekar , Forensic Expert of Sevagram Hospital, and Police Inspector Rajendra Shirtode , Adv. Anita Thakare was the resource person.



इंद्रजीत खांडेकर : लैंगिक छळ विरोधी कार्यशाळा; विविध ठिकाणी कार्यशाळेतून युवतींमध्ये जागृती

# गप्प राहिल्यामुळेच लैंगिक अत्याचार फोफावतो

वर्धा : सरकारी आकडेवारीनुसार लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या एकूण स्त्रीयांपैकी ७२ टक्के स्त्रिया या गप्प राहतात. त्यामुळे गुन्हेगारांची हिम्मत वाढून पुढे तो सरासरी १७ महिलांना आपले सावज करतो, असे निरीक्षण महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्था, सेवाग्रामचे न्यायवैद्यक तज्ज्ञ डॉ. इंद्रजित खांडेकर यांनी नोंदविले.

प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय येथे राज्य महिला आयोग व रा.तु.म. नागपूर विद्यापीठ यांच्यावतीने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ च्या अंमलबजावणीबाबत जागृतीपर कार्यशाळा घेण्यात आली. पहिल्या सत्रात ते साधनव्यक्ती म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. रंभा सोनाये तर उद्घाटक वर्धा शहर ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र शिरतोडे मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. खांडेकर म्हणाले, अगदी बालवयापासून मुलांना लैंगिक शिक्षण देवून समाजाला जागृत करणे गरजेचे आहे. याची सुरुवात घरापासून व्हावी. महिलांनी कामाच्या ठिकाणी कधीही कुणाची बाजू घेऊ नये, अनेकदा याची परतफेड करावी लागते. त्यातून लैंगिक छळ उद्भवतो. शेवटी कुठल्याही छळाची तक्रार करुनच आपण तो प्रश्न सोडवू शकतो. त्यामुळे मुलींनी गप्प न राहता अत्याचाराविरुद्ध बोलायला शिकले पाहिजे, असे सांगितले.

ठाणेदार शिरतोडे म्हणाले, महिलांनी सोशल मिडीयाबाबत अधिक सजग राहावे, असे सांगून त्यासंबंधित गुन्हांची माहिती दिली. पोलिसांकडे येणारी लैंगिक छळाची ९५ टक्के प्रकरणे ही खोटी असतात.

कार्यशाळेच्या अंतिम सत्रात जिल्हा न्यायालयातील ॲड. अनिता ठाकरे यांनी विविध न्यायालयीन प्रकरणांचे दाखले देत अधिनयम २०१३ बाबत विस्तृत माहिती दिली. यावेळी वर्धा जिल्हा पोलिसांच्यावतीने पोलीस शिपाई निलेश सडमाके, सचिन गाडवे, योगिता मसराम, सोनाली यांनी 'सायबर दिंडी' हे पथनाट्य सादर केले. कार्यशाळा आयोजनाची भूमिका डॉ. प्रा. अनिता देशमुख यांनी विशद केली. विविध सत्रांचे संचालन डॉ. सोनाली सिरभाते, डॉ. प्रतिभा ताकसांडे, डॉ. रेखा बोबडे यांनी तर डॉ. धनंजय सोनटक्के, प्रा.अमोल घुमडे, डॉ. मालिनी वडतकर यांनी आभार मानले. प्रा. मदनमोहन विश्वकर्मा, डॉ. सुधाकर सोनोने, डॉ. प्रियराज महेशकर आदींनी सहकार्य केले.(स्थानिक प्रतिनिधी)

## महाविद्यालयात महिला तक्रार निवारण समितीची स्थापना

मार्गदर्शन करताना डॉ. इंद्रजीत खांडेकर व मंचावरील अतिथी.

### लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायद्यावर कार्यशाळा

◆ वर्धा - राज्य महिला आयोग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर व औषधनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, बोरगाव(मेघे) यांच्या संयुक्त विद्यमाने महिला कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचार कायद्याविषयी कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले तर प्रमुख अतिथी प्रा. डॉ. क्षिप्रा सिंघम, डॉ. मनीषा पुराणिक, साधना गौतम मंचावर उपस्थित होत्या. प्रास्ताविक डॉ. मनीषा पुराणिक यांनी केले. स्लाईड शोच्या माध्यमातून माहिती देण्यात आली.

◆ पुलगाव - स्थानिक सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महाविद्यालय येथे महिला तक्रार निवारण समितीच्यावतीने आयोजित कार्यशाळेत कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ यावर मार्गदर्शन करण्यात आले. संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ या कायद्याबद्दल जाणीव व जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने महाविद्यालय स्तरावर कार्यशाळा घेण्यात आली.

◆ प्रास्ताविक महिला तक्रार निवारण समितीच्या पदसिद्ध केंद्राध्यक्ष प्रा. डॉ. विद्या चन्ने यांनी केले. स्त्री संरक्षणाकरिता विशाखा अधिनियम २०१३ हा अस्तित्वात येण्याकरिता कारणीभूत ठरलेली परिस्थितीचे विश्लेषण केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुलगाव न्यायालय बार कॉन्सिलच्या सचिव ॲड. माधुरी तराळ होत्या.

◆ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लैंगिक छळ किंवा शोषण म्हणजे काय, याबाबत सविस्तर माहिती दिली. यात समाविष्ट बाबी, लैंगिक छळाबाबत प्रतिबंध, मनाई, निवारण, अंमलबजावणी, कायद्यातील कलमे याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. भूषण रामटेके, नगरसेविका पुनम सावरकर, संस्था सचिव पूर्णिमा पाटणी उपस्थित होत्या. प्रा. विष्णु पवार, रामविजय राठोड, निशा सोमकुवर, कोमल काळे, आरती मोहेकर, प्रा. गवई, प्रा. गदरे व विद्यार्थी उपस्थित होते.(तालुका प्रतिनिधी)

**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha** is with **Pratibha Taksande** and **2 others**.

Feb 8, 2017 • View Thread

कामाच्या ठिकाणी होणा-या महिलांच्या लैंगिक छळा विरूध्द शासनाने कायदा केलेला आहे पण त्याची माहिती अशा छळाला बळी पडणा-या स्रियांना तसेच त्यांच्या कुटुंब... See More






4. Pre-marriage Counseling Workshop (12 Sept 2017)

आज महाविद्यालयात महिला तक्रार निवारण समितिच्या पुढाकाराने "विवाहपुर्व समुपदेशन कार्यशाळा" पार पडली. यामध्ये महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्था, सेवाग्र... See More




5. Activities on prevention of Cyber crime and issues related to girl students with Wardha Police.

6. Workshop with Students at Dahegaon Miskin, Tah. Wardha (Jan, 03, 2018) as a part of outreach programme
7. Gender Sensitization workshop in collaboration with Kranti Jyoti Savitribai Phule Women's study centre, Ms. Surekha Bharati and Bhagyashree Jawale was the resource persons. (March 7, 2018)




8. Participation in the workshop organized by Project RAIS (March 20, 2018) the aim of this activity is raising every boy to be gender equitable.

9. Organised Workshop in association with Krantijyoti Savitribai Phule Women's Study Centre, Savitribai Phule Pune University, Pune (12 March 2019).



10. Workshop on Awareness against Sexual harassment (17/07/2019)




**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha** is with **Pratibha Taksande** and **2 others**.

Jul 18, 2019 • View Thread

"विशाखा गाईडलाईन" अंतर्गत स्थापित महिला तक्रार निवारण समिती च्या वतीने लैंगिक अत्याचार विषयक समुपदेशन कार्यक्रम झाला. यामध्ये साधन व्यक्ती म्हणून विधीज्ञ डॉ. क्षिप्रा सिंघम व ज्येष्ठ वकिल ठाकरे मैडम यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.








11. Seminar on the Book: *Stree Purush Tulana* written by Tarabai Shinde. Dr. Snehal Ramteke, Department of Buddhist study, RTM Nagpur University was the guest. 28/02/2020.






12. Workshop on **'Protection of children from sexual offences Act (2012**) Amendment (2019) 04/03/2020 with Project "RAKSHIN". Mr. Avinash Deuskar, Mrs. Vimala Negi Deuskar, Mrs. Bharati Gomase was the resource persons









युवा कार्यक्रम और खेल मंत्रालय
MINISTRY OF
**YOUTH AFFAIRS AND SPORTS**

Sākshi
Equality in Inclusiveness

THE RAKSHIN PROJECT

# CERTIFICATE
## OF COMPLETION

This is to certify that


Priyadarshini Mahila Mahavidyalaya

has successfully completed the **THE RAKSHIN PROJECT** workshop for making N.S.S Volunteers Champions of Change for **POCSO** (Protection of Children Against Sexual Offences Act) 2012 on 04 March 2020.

Smita Bharti

**Ms. Smita Bharti**
Executive Director, The Rakshin Project - Sakshi

13. SAMBHAV film festival on gender diversities with MAVA (Men Against Violence and Abuse). 5-6 March 2020. Screening of Movies and Discussion on Gender issues. Festival was inaugurated by Dr. Vidhu Khare Das, Film and Drama Department Mahatma Gandhi International Hindi University, Wardha. Harish Sadani, Pravin Thote, Dr. Smita Wankhede, Dr. Ashok Borkar, Dr. Pradip Meshram, Adv. Pooja Jadhav Sanjay Sontakke were the key discussants.






# 'समभाव' चित्रपट महोत्सवाला मिळाली उत्स्फूर्त दाद

## प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयातील आयोजन; मुंबई येथील मावा संस्थेचे सहकार्य

**सकाळ वृत्तसेवा**



**वर्धा : चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी विचार व्यक्त करताना प्रा. डॉ. विधू खरे दास; मंचावर हरीश सदानी, प्राचार्य डॉ. रंभा सोनाये आणि इतर मान्यवर.**

वर्धा, ता. ९ : 'मेन अगेन्स्ट व्हायोलन्स अँण्ड अॅब्युज' अर्थात मावा या मुंबईतील संस्थेच्या सहकार्याने येथील प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयात दोनदिवसीय 'समभाव' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. वेव्ह, तुरुप, सनराईज, मोहिनी, खरवस, अनटाईंग द नॉट, दारवठा या चित्रपटांचे प्रदर्शन करण्यात आले. जेंडर व्यवस्थेमधील घुसमट, लैंगिकता, कौटुंबिक हिंसाचार, विवाह संस्थेतील घुसमट, जातधर्माच्या आडून होणारे भेदभाव आणि हिंसा, मातृत्व, पुरुषातील घुसमट, पुरुषातील स्त्रीत्वाच्या जाणिवा आणि त्याचे वास्तव अशा अनेक पैलूंवर सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय भाष्य या चित्रपटांतून अतिशय प्रभावीपणे मांडले आहे.

प्रत्येक चित्रपटानंतर उपस्थित श्रोत्यांनी अतिशय सकस आणि पोषक चर्चा केली. विद्यार्थी, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी या चित्रपट महोत्सवात सजगपणे सहभाग नोंदविला. मानवी नातेसंबंध कौटुंबिक, सामाजिक आणि राजकीय स्तरावर किती घुसमटत आहेत, याचे प्रत्यंतर चित्रपट आणि त्यावरील चर्चे तून आले. ही घुसमट थांबविता येऊ शकते, असा आशावाद चर्चेतून व्यक्त करण्यात आला.

महोत्सवाचे उद्घाटन महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे प्रा. डॉ. विधू खरे दास यांच्या हस्ते झाले. मावा संस्थेचे संचालक हरीश सदानी यांची चित्रपट महोत्सवाची संकल्पना आणि भूमिका सर्वांना आकर्षित करून गेली. डॉ. प्रदीप मेश्राम, डॉ. अशोक बोरकर, डॉ. स्मिता वानखेडे, प्रा. किरण रघुर्ते, प्रा. राहुल राऊत, मुकेश शेंडे, प्रवीण थोटे यांनी चर्चेत भाग घेतला. पितृसत्तेच्या विरोधात आता नियोजनबद्ध संघर्ष करण्याची वेळ आली आहे. आपल्या आसपासच्या परिसर कोरडा होत असतानाच आपल्याला संवादातून संवेदनशील ओलावा निर्माण करावा लागेल; अन्यथा समाज म्हणून आपण संपत जाऊ, असे मत यावेळी मांडण्यात आले. प्राचार्य डॉ. रंभा सोनाये यांनी स्त्री-पुरुष यांच्यातील मैत्रीभाव असणे महत्त्वाचे आहे, असे मत व्यक्त केले. डॉ. धनंजय सोनटक्के यांनी चित्रपट महोत्सवाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. वैचारिक जोखडातून मुक्त होऊन संवैधानिक मूल्ये जपणे हे समभाव रुजविण्यासाठी महत्त्वाचे आहे, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

या महोत्सवाला प्रवीण थोटे, प्रा. प्रभाकर पुसदकर, अतुल शर्मा, सुषमा शर्मा, डॉ. किरण जाजू, डॉ. उल्हास जाजू, संजय सोनटक्के, अॅड. पूजा जाधव, प्रा. नूतन माळवी, प्रशांत नागोसे, भारती गोमासे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

आयोजनाकरिता डॉ. मालिनी वडतकर, डॉ. प्रतिभा ताकसांडे, डॉ. सुधाकर सोनोने, डॉ. प्रियराज महेशकर, डॉ. सोनाली सिरभाते, डॉ. मृणालिनी बंड, प्रा. अमोल घुमडे, प्रा. विजय नवघरे, वेदनाथ चौधरी, दिनेश भगत, विनोद बावणे, नरेश आगलावे, विजय राऊत, रुपी बोधाने यांनी सहकार्य केले.

# प्रियदर्शनी महाविद्यालयातील फिल्म फेस्टिव्हल

## विविध चित्रपटाचे प्रदर्शन : आयोजनासाठी मुंबईच्या संस्थेचा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क



चित्रपट महोत्सवात सहभागी झालेले विद्यार्थी, मान्यवर पाहुणे.

वर्धा : येथील प्रियदर्शनी महिला महाविद्यालयात मेन अगेन्स्ट व्हयोलन्स अॅन्ड अॅब्यूज मुंबई या संस्थेच्या सहकार्याने समभाव आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. वेव्ह, तुरूप, सनराईज, मोहिनी, खरवस, अनटाईंग द नॉट, दारवठा या सिनेमाचे प्रदर्शन करण्यात आले. विद्यार्थी, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी अतिशय सजगपणे या फिल्म फेस्टिव्हलमध्ये सहभाग नोंदवला.

महोत्सवाचे उद्घाटन म. गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ प्रा. डॉ. विधु खरे दास यांच्या हस्ते झाले. मावा संस्थेचे संचालक हरिष सदानी यांची फिल्म फेस्टिव्हलची संकल्पना आणि भूमिका सकारात्मक आहे. त्यांच्या दोन दिवसांतील सहभागाने फिल्म फेस्टिव्हल रंगला. डॉ. प्रदीप मेश्राम, डॉ. अशोक बोरकर, डॉ. स्मिता वानखेडे, प्रा. किरण रघुर्ते, प्रा. राहुल राऊत, मुकेश शेंडे, प्रविण थोटे यांनी चर्चक म्हणून भूमिका पार पाडली. डॉ. धनंजय सोनटक्के यांनी या फिल्म फेस्टिव्हलच्या आयोजनामागील भूमिका मांडली. या महोत्सवात प्रविण थोटे प्रा. प्रभाकर पुसदकर, अतुल व सुषमा शर्मा, डॉ. किरण जाजू, डॉ. उल्हास जाजू, लोकमित्र संजय सोनटक्के, अॅड. पूजा जाधव, प्रा. नुतन माळवी, प्रशांत नागोसे, भारती गोमासे यांची उपस्थिती होती. विद्यार्थी, नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती.

---

**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha** is with **Amol Ghumade** and **3 others**.

Mar 8, 2020 • View Thread

MAVA अर्थात men against violence & abuse ही मुंबई स्थित NGO लिंगभाव समानतेवर काम करते. या संबंधाने युवा वर्गात जाणीवजागृती करण्यासाठी MAVA विविध शहरा... See More












Principal
Priyadarshini Mahila
Mahavidyalaya, WARRDA